**<u>ठळक बातम्या</u>**

- राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते आय आय टी मुंबईत कर्करुग्णांसाठी CAR-T सेल उपचार पद्धतीचं लोकार्पण
- लोकसभा निवडणुकीच्या दुसऱ्या टप्प्यासाठी उमेदवारी अर्ज दाखल करण्याची मुदत संपली
- मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाच्या निवडणूक जाहीरनाम्यात अतिश्रीमंतांवर कर, खाजगी क्षेत्रात आरक्षण, या मुद्द्यांचा समावेश
- येत्या चार दिवसात पूर्व आणि भारतीय द्वीपकल्पात उष्णतेची लाट येण्याची शक्यता

**आणि**

- मुंबई आणि राष्ट्रीय शेअर बाजारात आज मोठ्या चढ-उतारानंतर निर्देशांक विक्रमी पातळीवर बंद

**<><><><><>**

कर्करुग्णांसाठी CAR-T सेल उपचार पद्धतीमुळे सर्व मानव जातीसाठी आशेचा नवा किरण निर्माण झाल्याचं राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी आज सांगितलं. त्यांनी मुंबई दौऱ्यात आय आय टी इथं CAR-T सेल उपचार पद्धतीचं लोकार्पण केलं. त्यानंतर आयोजित कार्यक्रमात त्या बोलत होत्या. संपूर्णपणे भारतात विकसित झालेल्या या उपचार पद्धतीमुळे अनेकांचे प्राण वाचतील, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला. या उपचार पद्धतीमुळे भारताला प्रगत वैद्यकीय सेवा देणाऱ्या देशांच्या यादीत स्थान मिळाल्याची भावना राष्ट्रपतींनी व्यक्त केली.

रुग्णांसाठी किफायतशीर आणि सहज उपलब्ध असलेल्या टाटा मेमोरियल सेंटर आणि आयआयटी मुंबईनं संयुक्तरित्या याची निर्मिती केली आहे. या पद्धतीमुळे कमीत कमी खर्चात रुग्णांवर परिणामकारक उपचार शक्य होणार आहेत.

यावेळी राज्यपाल रमेश बैस, आयआयटी मुंबईचे संचालक शुभाशीष चौधरी यांच्यासह विविध मान्यवर उपस्थित होते.

**<><><><><>**

लोकसभा निवडणुकीच्या दुसऱ्या टप्प्यासाठी उमेदवारी अर्ज दाखल करण्याची मुदत आज संपली. या टप्प्यात १२ राज्यं आणि केंद्रशासित प्रदेशांमधल्या ८८ लोकसभा मतदारसंघांमधे निवडणूक होणार आहे. महाराष्ट्रातल्या बुलडाणा, अकोला, अमरावती, वर्धा, यवतमाळ-वाशिम, हिंगोली, नांदेड आणि परभणी या ८ लोकसभा मतदारसंघात दुसऱ्या टप्प्यात मतदान होणार आहे.

**अकोल्यातून** वंचित बहुजन आघाडीचे राष्ट्रीय अध्यक्ष प्रकाश आंबेडकर, **अमरावती**मध्ये भाजपा उमेदवार नवनीत राणा, **हिंगोलीत** शिवसेनेचे नांदेड जिल्हा प्रमुख बाबुराव कदम कन्हाळीकर, **यवतमाळ-वाशिम** लोकसभा मतदारसंघामधून शिवसेनेच्या राजश्री पाटील, **नांदेडमध्ये** भाजपा उमेदवार प्रतापराव पाटील चिखलीकर आणि वंचित बहुजन आघाडीचे उमेदवार अविनाश भोसीकर, **बुलडाण्यातून** शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे उमेदवार नरेंद्र खेडेकर यांनी अर्ज भरला. **परभणीतून** वंचित बहुजन आघाडीचे पंजाब डख, इत्यादी उमेदवारांनी आज उमेदवारी अर्ज दाखल केले.

**<><><><><>**

**उस्मानाबाद** लोकसभा मतदारसंघासाठी अर्चना पाटील यांची उमेदवारी आज राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष खासदार सुनील तटकरे यांनी मुंबईत झालेल्या

वार्ताहर परिषदेत जाहीर केली. तत्पूर्वी अर्चना पाटील यांनी आज पक्षात प्रवेश केला. त्या भाजपा आमदार राणा जगजीत सिंह पाटील यांच्या पत्नी आहेत.

राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षानं आज २ उमेदवार जाहीर केले. भिवंडीतून सुरेश म्हात्रे आणि बीडमधून बजरंग सोनवणे यांना पक्षानं उमेदवारी दिली आहे.

**<><><><>**

मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षानं आज लोकसभा निवडणुकीसाठी नवी दिल्लीत आपला जाहीरनामा जाहीर केला. पक्षाचे सरचिटणीस सिताराम येचुरी, पोलिटब्युरो सदस्य प्रकाश करात, वृंदा करात, निलोत्पल बसु आणि तपन सेन यावेळी उपस्थित होते. अतिश्रीमंतांवर कर, सामान्य संपत्ती कर आणि वारसा करासाठी कायदा, खाजगी क्षेत्रात आरक्षण, निवडणुकीसाठी सरकारचा निधी आणि राजकीय पक्षांसाठी कंपन्यांच्या पैशावर बंदी या मुद्द्यांचा या जाहीरनाम्यात समावेश आहे. काम करण्याच्या अधिकाराचा मूलभूत हक्कात समावेश करण्यासाठी पक्ष वचनबद्ध असल्याचं या जाहीरनाम्यात म्हटलं आहे. बेकायदा कारवाया प्रतिबंधक कायदा आणि मनिलॉड्रिंग प्रतिबंधक कायदा रद्द करण्याचं आश्वासनही या पक्षानं दिलं आहे. आपला पक्ष लोकशाही आणि धर्मनिरपेक्षतेला अधिक मजबूत करेल, असा विश्वास येचुरी यांनी यावेळी व्यक्त केला.

काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे आणि ज्येष्ठ नेते राहुल गांधी उद्या पक्षाचा जाहीरनामा जाहीर करणार आहेत. भाजपाच्या निवडणूक जाहीरनामा समितीची बैठक नवी दिल्लीत ज्येष्ठ नेत राजनाथ सिंह यांच्या नेतृत्वाखाली सुरू आहे.

**<><><><>**

प्रधानमंत्री आणि भाजपाचे ज्य़ेष्ठ नेते नरेंद्र मोदी यांनी आज पश्चिम बंगालमधे कुचबिहार इथं प्रचारसभा घेतली. पश्चिम बंगालला हादरवणाऱ्या संदेशखली

प्रकरणातल्या आरोपीला वाचवण्यासाठी राज्यातलं तृणमुल काँग्रेस सरकार सर्वतोपरी प्रयत्न करत आहे, अशी टीका त्यांनी केली. केंद्रीय योजनांची अंमलबजावणी पश्चिम बंगालमधे केली जात नाही. केंद्रानं विक्रमी निधी देवूनही अनेक प्रकल्प तृणमुल काँग्रेसनं पूर्ण केलेले नाहीत. यावेळी त्यांनी काँग्रेसवरही टीका केली. कित्येक दशकं काँग्रेसनं फक्त गरीबी हटावच्या घोषणा दिल्या. मात्र भाजपानं कठोर मेहनत करुन २५ कोटी लोकांना गरीबीतून मुक्त केलं, असं मोदी म्हणाले.

**<><><><>**

येत्या चार दिवसात पूर्व आणि भारतीय द्वीपकल्पात उष्णतेची लाट येण्याची शक्यता भारतीय हवामान विभागानं व्यक्त केली आहे. अंतर्गत उत्तर कर्नाटक, ओदिशा, पश्चिम बंगाल, झारखंड, तेलंगणा आणि आंध्र प्रदेशचा किनारा अशा भागात उष्णतेची लाटसदृश स्थिती असल्याची शक्यता भारतीय हवामान विभागानं वर्तवली आहे. येत्या रविवारपर्यंत ईशान्य भारतात वादळी वाऱ्यासह पावसाचा अंदाज आहे. अरुणाचल प्रदेश, आसाम, मेघालय, नागालँड, मणिपूर, मिझोराम आणि त्रिपुरा या ठिकाणी हलका ते मध्यम स्वरूपाचा पाऊस पडण्याची शक्यता असल्याचं हवामान विभागानं सांगितलं.

**<><><><>**

देशातले शेअर बाजार आज मोठ्या चढ-उतारानंतर विक्रमी पातळीवर बंद झाले. सेन्सेक्सच्या आजच्या किमान आणि कमाल पातळीतला फरक १ हजार अंकांहून अधिक होता. कालच्या तुलनेत शेअर बाजार आज तेजीत सुरू झाले. पण नंतर त्यात घसरण होत गेली. सेन्सेक्सनं यावेळी ७३ हजार ४८५ अंकांच्या आणि निफ्टीनं २२ हजार ३०४ अंकांच्या नीचांकी पातळीला स्पर्श केला. त्यानंतर बाजारानं पुन्हा तेजीकडे वाटचाल केली आणि सेन्सेक्सनं ७४ हजार ५०२

अंकांच्या आणि निफ्टीनं २२ हजार ६१९ अंकांच्या विक्रमी पातळीला स्पर्श केला. दिवसअखेर सेन्सेक्स ३५१ अंकांची वाढ नोंदवून ७४ हजार २२८ आणि निफ्टी ८० अंकांची वाढ नोंदवून २२ हजार ५१५ अंकांवर स्थिरावला.

**<><><><><>**

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या अखिल भारतीय प्रतिनिधी सभेत आज नवी कार्यकारिणी जाहीर करण्यात आली. डॉ. मोहन भागवत यांची पुन्हा सरसंघचालक म्हणून निवड झाली आहे. दत्तात्रय होसबाळे यांची सरकार्यवाह म्हणून फेरनिवड झाली आहे. डॉ. कृष्णकुमार, के सी मुकुंद, अरुण कुमार, रामदत्त चक्रधर, अलोक कुमार, अतूल लिमये यांची सह सरकार्यवाह पदावर निवड झाली आहे.

**<><><><><>**

अमरावतीच्या खासदार नवनीत राणा यांचं अनुसूचित जातीचं जात प्रमाणपत्र सर्वोच्च न्यायालयानं वैध ठरवलं आहे. जात प्रमाणपत्र पडताळणी समितीनं पुरेशा कागदपत्रांची तपासणी करुन त्यांचं जात प्रमाणपत्र वैध ठरवलं आहे. त्यामुळं त्यात कोणाच्याही हस्तक्षेपाची गरज नसल्याचं स्पष्ट मत न्यायमूर्ती जे के माहेश्वरी आणि संजय करोल यांच्या पीठानं नोंदवलं.

माजी खासदार आनंदराव अडसूळ आणि सुनिल भालेराव या नेत्यांनी राणा यांच्या जात प्रमाणपत्रावर आक्षेप घेणाऱ्या याचिका २०१७ मध्ये दाखल केल्या होत्या. त्यावर राणा या शीख-चमार जातीतल्या आहेत. महाराष्ट्रातली मोची किंवा चांभार ही जात यापेक्षा वेगळी असल्याचं निरीक्षण नोंदवत मुंबई उच्च न्यायालयानं त्यांचं जात प्रमाणपत्र अवैध ठरवलं होतं. त्याला राणा यांनी सर्वोच्च न्यायालयात आव्हान दिलं होतं.

**<><><><><>**

उत्तराखंडमधे पिठोरगड आणि विकासनगर इथं आज भाजपाचे राष्ट्रीय अध्यक्ष जे. पी. नड्डा यांनी प्रचारसभा घेतल्या. अलमोरा लोकसभा मतदारसंघातून भाजपाचे उमेदवार अजय तामता निवडणूक लढवत असून पिठोरगडमधली सभा त्यांच्यासाठी आयोजित करण्यात आली होती. भाजपाची विकासाची विषयपत्रिका आणि इतर पक्षांतले गैरप्रकार यातून भाजपानं निवड करावी असं आवाहन त्यांनी केलं. त्यांनी काँग्रेसवर भ्रष्टाचाराचा आरोप केला. डेहराडून इथं विकासनगरात त्यांनी टेहरी लोकसभा मतदारसंघातल्या भाजपा उमेदवार माला राजलक्ष्मी शहा यांचा प्रचार केला.

**<><><><><>**

आयपीएल क्रिकेट स्पर्धेत आज अहमदाबादच्या नरेंद्र मोदी स्टेडियमवर गुजरात टायटन्स आणि पंजाब किंग्ज यांचा सामना सुरू आहे. पंजाब किंग्जनं नाणेफेक जिंकून प्रथम क्षेत्ररक्षण करण्याचा निर्णय घेतला आहे.

शेवटची बातमी हाती आली तेव्हा गुजरात टायटन्सच्या ८ षटकात १ बाद ६५ धावा झाल्या होत्या.

**<><><><><>**

श्रोतेहो, राज्यातल्या लोकसभा मतदारसंघातले उमेदवार, निवडणूक लढवण्यामागची त्यांची भूमिका, स्थानिक राजकारण यांचा आढावा घेणारा ‘लोकनिर्णय महाराष्ट्राचा’ हा कार्यक्रम, आकाशवाणीनं सुरू केला आहे. कार्यक्रमाच्या उद्याच्या भागात आपण गडचिरोली-चिमूर लोकसभा मतदार संघाचा आढावा घेणार आहोत. संध्याकाळी सव्वा सात ते साडे सात वाजेपर्यंत आकाशवाणी मुंबईच्या अस्मिता वाहिनीवर आणि समाज माध्यमांवर हा कार्यक्रम ऐकता येईल.

**//<><><><><>//**